अशा या अंधारमय कालखंडात एखाद्या साध्वीने जन्म घ्यावा आणि आपल्या कार्याने समाजाला प्रकाशाकडे घेऊन जावे. अशा त्या काळातील स्त्रियांना वाटत होते. स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी क्रांतीज्योतीचा जन्म झाला.

खंडाळा तालुक्यातील नायगाव या छोट्याशा खेडेगावात एक बालिका जन्माला आली. खंडोजी नेवसे पाटील यांनी आपल्या मुलीचे नांव सावित्री असे ठेवले. या गावात मोजकीच घरे आणि लोक नावानिशी एकमेकांना ओळखत. कठीण प्रसंगी एकमेकांच्या मदतीला धावून जात असत. नेवसे पाटील हे एक गावातील प्रतिष्ठीत गृहस्थ होते. गावचे पाटील म्हणुन लोक त्यांच्याकडे आदराने पाहत असत. तर सावित्रीबाई पाटलांच्या कन्या म्हणुन लोकांना त्यांचे विशेष कौतूक होते. अशा वातावरणात सावित्रीबाई लहानाच्या मोठ्या होत होत्या. सावित्रीबाई चार वर्षाच्या झाल्या. त्यांना आता समज येऊ लागली. वय जरी लहान असले तरी त्या चौकस बुद्धीच्या होत्या. एखादी नविन गोष्ट पाहिली की, त्याबद्दल आपल्या आईला अनेक प्रश्न विचारून भंडाऊन सोडत.

मुलगी दिवसामाजी मोठी असताना वडिलांनी वरसंशोधनाचे काम सुरू केले. अखेर त्यांना पुण्यात राहणारे फुले कुटूंबीय की जे आपले नाव आदब राखुन असणारे पाहण्यात आले. ते फुलांचा व्यापार करायचे म्हणुन लोक त्यांना फुले या नावाने ओळखू लागले. अखेर सावित्रीबाई यांचा जोतिबा यांचाशी विवाह निश्चित झाला. त्यावेळी सावित्रीबाईंचे वय अवघे 5 वर्षे होते. तर जोतिबांचे 9 वर्षे होते.

सावित्रीबाई व जोतिबा फुले यांचा विवाह पार पडला. ते साल होतं 1840. आता सावित्रीबाई जोतिबांच्या सौभाग्यवती बून सासरी आल्या. पण हे घर त्यांना वेगळे वाटले नाही की, आपण परक्यांना घरी

आलोत असेही त्यांना वाटले नाही. सासरचे घर आलो आलो असेही वाटले नाही. सासरचे घर म्हणजे आपल्या आई-वडिलांचे जणू दुसरे घर अशीच तयांच्या मनाची भावना झाली. त्या आपल्या पतींना शेटजी य नावांने संबोधायच्या.

जोतिबांना शिक्षणांची खूप आवड होती. जोतिबा वाचन करीत असताना सावित्रीबाई ऐक असत. ते सावित्रीबाईंना कर्तृत्ववान माणसांची चरित्र वाचून दाखवत. शिवाजी महाराज, वॉशिंग्टन यांचे फोटो दाखवुन त्यांना त्यांच्या कार्याची माहिती सांगत म्हणुनच जोतिबा फुले हे पुढे जाऊन महान विचारवंत, कार्यकर्ते, समाज सुधारक, लेखक, संपादक, क्रांतीकारक झाले. म्हणुन त्यांना महात्मा अशी उपाधी मिळाली.

आता सावित्रीबाई सुद्धा शिकू लागल्या, लिहू लागल्या. स्त्री हा घराचा पाया आहे, तिचे शिक्षण झाले. तरी सारे घर सुधारते. हे जोतिबांचे विचार. आपल्या पतीच्या आचार विचारांनी सावित्रीबाई पुरत्या भाराऊन गेल्या. पतीच्या वाटचालीत मनापासुन साथ देऊ लागल्या.

दोघांचेही एकच ध्येय होते आणि ते म्हणजे माणसां-माणसांतील भेदभाव दूर करून सर्वांना शिक्षण देणे, जोतिबांनी तर जणू तशी प्रतिज्ञाच केली.

काही लोकांनी स्वार्थासाठी अनिष्ट रूढी, कल्पना, चालीरिती समाजात पसरवल्या. ह्या खुळखट कल्पना प्रगतीला अडथळा आणतात. माणसा-माणसांत भेदभावाची भावना निर्माण करतात, अशा कल्पना मोडून काढायला हव्यात. यासाठी जोतिबा व सावित्रीबाईंनी 1 जानेवारी 1848 रोजी पुण्यात बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. तर त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षीका बनल्या. सुरूवातीला सावित्रीबाईंच्या शाळेत सहा मुली होत्या. 1848 त्यानंतर 40-45 अशी पटसंख्या वाढीस लागली. लोकांना विरोध असुन त्यांनी महिलांच्या शिक्षणाचा वसा हाती घेतला. अंगावर चिखलाचे गोळे फेकले. तरी त्यांनी कधी हार मानली नाही. कितीही कष्ट पडले, अपमान झाला तरी चालेल पण स्त्रियांना, मुलींना शिकवण्याचं काम देव आज्ञेनेचे पूर्ण केले. त्यांनी कनिष्ठ वर्गातील स्त्रियांना देखील शिक्षणाचे धडे दिले.

स्त्रि शिक्षणाबरोबरच अन्य क्षेत्रातील काम करणे गरजेचे आहे असे त्यांना वाटू लागले. स्त्रियांना त्या आत्मविश्वास देऊ लागल्या. बालविवाह झालेल्या मुली, तरूण वयातच विधवा होत असतात. तर ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाहास अजिबात मान्यता नव्हती. त्यामुळे अशा स्त्रियांना पतीच्या मृत्यूनंतर सती जावे लागे. म्हणुन सावित्रीबाईंनी सतीबंदी, बालहत्या प्रतिबंधगृह सुरू केले. फुले यांनी सुरू केलेल्या बालहत्या प्रतिबंध गृहातील विधवा स्त्रियांची मुले व मुली त्यांचा त्या आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ करत. अशाच एका विधवा स्त्रिचे मुल जोतिबा व सावित्रीबाईंनी दत्तक घेतले व त्यांचा त्या आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ करून आपले नाव दिले. हे मुल मोठे होऊन यशवंत फुले या नावाने ओळखू लागले.

नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन केले व केशवपन पद्धती बंद केली. पुनर्विवाहाच्या कायद्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. 24 सप्टेंबर 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची त्यांनी स्थापना केली. जाचक, रूढी, परंपरा, चालीरितींचा त्याग करून माणसांनी माणसासारखे राहावे, वागावे, माणुसकीचा धर्म पाळावा. अशी त्यांनी समाजाला शिकवण दिली. सावित्रीबाई आपल्या पतीच्या मानवतेच्या कामात कुठेही मागे राहिल्या नाहीत. त्यांनी आपल्या पतीला मोलाची साथ दिली. म्हणुनच मानवतेचे पुजारी जोतिबा महात्मा म्हणुन ओळखू लागले.

दोघां पती-पत्नीने खुप कष्ट करून, परिश्रम घेऊन जगाला माणुसकीच्या धर्माची शिकवण दिली. हे आचरण समाज जागृतीचे महान कार्य ठरले. सावित्रीबाईंनी आपल्या विचारांचा प्रसार साहित्यातूनही केला. काव्यफुले, व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह लिहून समाजाला प्रबोधन केले.

1896 मध्ये पडलेल्या दुष्काळात पोटासाठी शरीरविक्री करणाऱ्या स्त्रियांना दुष्ट लोकांच्या तावडीतून सोडवून सत्यशोधक कुटूंबात आश्रय दिला. त्यांच्या कार्याला हातभार लावणाऱ्या अनेक स्त्रिया जन्माला आल्या.

1896-1897 मध्ये पुण्यात प्लेग साथ पसरली. हा भयानक रोग पसरून लागला. तेंव्हा दवाखान्यात रूग्णांची सेवा केली. ही रूग्णसेवा करताना सावित्रीबाईंना देखील प्लेगची लागण झाली. अखेर 10 मार्च 1897 मध्ये सावित्रीबाईंचे निधन झाले.

शेवटच्या श्वासापर्यंत सावित्रीबाईंनी समाजाची सेवा केली. म्हणुन त्या क्रांतीज्योती एक महान साध्वी म्हणुन नावारूपाला आल्या. समाजसेवेची अखंड तेवत ठेवणारी ज्योत त्यांच्या स्मृतीला शतशः प्रणाम!

आज 3 जानेवारी त्यांच्या या जन्मदिनी महिला मुक्तीदिन व बालिकादिन म्हणुन आपण साजरा करतो. आज दिनाचे औचित्य साधुन क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या विचारांचा व कार्याचा प्रसार व्हावा. ही सावित्रीची लेक मोजक्या शब्दांत त्यांचे कार्य सर्व स्त्रीशक्तीला समर्पित करते.

**ज्ञानेश्वरी राजेंद्र कापसे**
**बी.ए. द्वितीय वर्ष,**

# क्रांतीजोति सावित्रीबाई फुले यांचे - जीवन व कार्य...

सावित्रीबाई जोतिराव फुले (3 जानेवारी इ.स. 1831, मृत्यू 20 मार्च इ.स. 1897) या एक भारतीय समाजसुधारक , शिक्षणतज्ञ आणि कवयित्री होत्या. भारतातील पहिल्या महिला शिक्षीका म्हणुन त्यांना ओळखले जाते. आपले पती महात्मा जोतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलाचे अधिकार सुधारण्यात महत्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. या दोघांनी 1 जानेवारी 1848 रोजी पुणे येथील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरूवातीच्या शाळांपैकी एक होती. तत्पूर्वी अमेरिकन मिशनरी सिंथिया फरार यांनी 1829 मध्ये मुंबईत मुलींची शाळा सुरू केली होती. 1847 मध्ये विद्यार्थी साहित्यीक आणि वैज्ञानिक समाजाने मुंबईच्या गिरगाव परिसरात मुलींसाठी कमलबाई हायस्कुल सुरू केले. पेरीचरण सरकार यांनी 1847 मध्ये बारासात या बंगाली शहरात कालीकृष्ण गर्ल्स हायस्कुल नावाची मुलींसाठी शाळा सुरू केली. पारशी समुदाय मुंबईने 1847 मध्ये मुलींसाठी एक शाळा स्थापन केली होती.

सावित्रीबाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नांव खंडोजी नेवसे पाटील होते. इ.स. 1840 साली जोतिराव फुले यांच्याशी सावित्रीबाई यांचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव पेशव्यांनी त्यांना पुण्याला येऊन राहिल. व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना 'फुले' हे आडनाव मिळाले होते.

सावित्रीबाईचे पती जोतिराव फुले यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस आत्या सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणुन काम करायच्या त्यांना इंग्रजी कळायचे वे बोलताही यायचे. 1 मे इ.स. 1847 रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. हि त्यांची पहिली शाळा. सगुणाऊ या गुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवु लागल्या. पुढे ही शाळा मध्येच बंद पडली.

इ.स. 1896 सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडावून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटूंबात आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणुन पंडिता रमाबाई गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

महत्वाचं म्हणजे इ.स. 1896-97 साला दरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला होता. हा जीवघेणा आजार अनेकांचा जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे. हे कळल्यावर ब्रिटीश

शासनाने जबरदस्तीने संभाव्य रूग्णांना वेगळे काढून स्थानांतरीत करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेग पिडीतांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटूंबीयांना आधार देऊ लागल्या व प्लेगच्या रोग्यांची त्या सेवा करत असत.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्वाची व्यक्ती म्हणुन सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणुक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवुन आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या.

सावित्रीबाईंनी नाभिक समाजाशी संवाद साधुन विधवा महिलांच्या केशवपन विरूद्ध आंदोलन केले. पितृसत्तावादी आणि स्त्रीविरोधी, रूढी परंपरेपरेविरूद्ध आवाज उठविला आणि महिलांना मानवी सन्मानाने जगण्याची संधी दिली. 1892 मध्ये महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे म्हणुन त्यांनी महिला सेवा मंडळ स्थापन केले. ज्यामध्ये महिलांना स्वालंबी बनवण्यासाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे सुरू केले. जेणेकरून महिला आत्मनिर्भर होऊ शकतील.

सावित्रीबाई भारताची पहिला महिला शिक्षीका, समाजसुधारक आणि मराठी कवयित्री होती. विधवांचे पुनर्विवाह, अस्पृश्यता निर्मुलन, महिलांना शोषणातून मुक्त करणे. तसेच दलित महिलांना शिक्षीत करणे. यासारख्या महत्वाच्या कार्ये त्यांनी केले. जातीवाद, लैगिकतावाद आणि वर्णभेदावरून तिव्र लढा दिला आणि समाजात आदरणीय स्थान निर्माण करून महिलांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले. सावित्रीबाईंच्या जीवनाचा प्रत्येक क्षण महिला आणि मागासवर्गीयांच्या उत्कर्षास समर्पित होता.

**गांधले ऋतूजा बंडू**
**बी.ए. प्रथम वर्ष,**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आणि शैक्षणिक विचार...

वाचन, श्रवण, मनन, चिंतन,
हे ज्ञानाचे दरवाजे आहेत.
स्वतःहून स्वतःसाठी
बंद करून ठेवतात,
त्याकडे पाठ फिरवतात...
ती माणुस या संज्ञेस
ते म्हणजे दो पायाचे पशु होत!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, बुद्धाच्या काळात स्त्रियांना समतेने वागवले जाई. राजस्त्रीयापासून ते गणिका, वेश्यांनाही धम्मज्ञान दिले जाई. धमचर्चेत सहभागी करून घेतले जाई. प्रवज्जा होऊन स्त्रियांनी भिख्खू संघात प्रवेश घेतला असल्याने बुद्ध हे स्त्रियांच्या अवनतीत कारणीभूत नसुन बुद्धानंतर झालेला मनू हाच याला खरा जबाबदार आहे. कारण त्याने स्त्रियांना जखडून ठेवणारी मनूस्मृती लिहून स्त्रियांची अवनती केली. स्त्री ही कुटूंबाची प्रगती साधणारी एकमेव कर्ता असुनही हिंदू स्त्रियांची उन्नती होऊ नये, धर्म, ज्ञान, यापासून आणि बुद्ध धम्मापासून ब्राह्मणे भ्रामके कल्पनेत गुंतवून गुलाम बनविले. स्त्री ही पुरूषांची दासी आहे असे तिच्या मनात ठासले आणि तिला घरात डांबुन ठेवण्याचे षडयंत्र रचून मनूने पुरूष प्रधानतेची बिजे घट्ट रोवली. स्त्रीने सारे काही मान्य केले. या साऱ्याचे कारण स्त्रियांच्या मनात अज्ञानाशिवाय दुसरे काहीच नव्हते, राष्ट्रपिता जोतिबा फुले यांनी शिक्षणाचा पाया घातला. सावित्रीबाईंनी परंपरा लाथाडल्या आणि राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री सुखाचे कायदे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या साऱ्या समस्यांचा अभ्यास केला. विषमतेच्या नाग्यांनी बाबासाहेबांनाही सोडले नव्हते. त्यांच्यासमोर स्त्रियांचे कितीतरी प्रश्न होते. असमानता आणि अज्ञाना हेच साऱ्यांचे मुळ होते. अस्पृश्यांच्या दुःखाला तर कुणीच वाली नव्हते. अतिशुद्ध सारेच पिचले होते. समाज परंपराच्या सन्मान करेल. तेंव्हाच समाज सुखी होईल. अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धांची समता अभिप्रेत होती. ते कायदेपंडीत होते. म्हणुन समाजातील सर्व स्तरातील प्रथमापासुन ते शेवटच्या माणसासाठी घटना लिहीली.

कमकुवतांना स्वबळावर जगण्याची शक्ती दिली. परंतु परंपरेच्या खोल खड्यात मुंडकी खुपसून पडलेल्या माणसांना स्त्री एक माणुस आहे. तिच्यामुळेच आपले अस्तित्व आहे. हे मान्य करण्याची दान नव्हती. स्त्रि शिकू नये, स्त्रिला हक्काची जाणिव होऊ नये. अशी परंपरा मनुवाद्यांना हवी होती. आगारकर राजाराम मोहनराय, रानडे यांच्यासारख्या समाज सुधारकांच्या मनात स्त्रियांच्या वेदनाची जाणिव होते. त्यांनी विकृत रूढींच्या विरोधात आवाज उठविला होता. परंतस्मशतीवर कुणीही बोट उचलले नाही.

स्त्रियांच्या प्रति प्रचंड आदर असणारा महामानव 19 व्या शतकात खऱ्या अर्थाने जन्मास आला आणि बुद्धांच्या बंधूता, समता स्वातंत्र्य, आणि न्यायावर आधारित मुलधिष्ठित तत्वावर राज्यघटना लिहिली.

आपण नफातोटा न बघता आपल्या कर्तव्याला जागल पाहिजे. आपला स्वाभिमान जागी ठेवा. कारण स्वाभिमानशुन्यतेने जीवन जगणे हे नामर्दपणाचे लक्षण ठरेल. प्राथमिक शिक्षण हे राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे.

तुम्ही किती वर्षे जगलात हे महत्वाचे नाही, तुम्ही काय बनून, कसे जगलात याला महत्व आहे.

तुम्ही जे नाही, ते बनून जगता,

की तुम्ही जे आहात ते बनुन जगता?

त्यामुळे या शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला पाहिजे. नाहीतर ज्या देशातील बहूजन समाज निरक्षर आहे. अशा देशाचा जीवन कलहात टिकाव लागवायचा नाही. हे सांगणेच नको. विद्या विनयेत शोभते शिकलेली माणसे नम्र, विनयशिल व मानवतावादी असतात. एवढेच नव्हे तर माणुसकीची वागणुक इतरांना देतात हे खरे नाही. कारण नुसत्या शिक्षणाने सुशिक्षीत वर्गाकडून आम्हा अस्पृश्य बांधवावर ह्या सुधारणेचा काळात अन्याय, अत्याचार झाला. नसता हे सांगणे नकोच.

तुमचे वय किती आहे.

पद आणि पदव्या किती आहेत.

विद्वता किती आहे,

तुम्ही दुनिया किती बघितली.

हे यशस्वी होण्यासाठी महत्वाचे नाही.

यशस्वी होण्यासाठी-

तुम्ही घेतलेल्या

तुम्हांला आलेल्या अनुभवातून काय शिकलात

किती धडे घेतलात - हे महत्वाचे!

शिक्षणामुळे माणसांची शोषणातून पिळवणुकीतून सुटका होते आणि माणुस स्वाभीमानाने जीवन जगतो. त्याला अन्याय अत्याचार सहन होत नाहीत. जीवनाची जाणीव जगाची ओळख, मानवी, संस्कृती त्याला समजते आणि त्याला आनंद मिळतो. ज्या समुदायामध्ये शिक्षणाचा अभाव असतो. तो समुदाय पशुपाळीवरचे जीवन जगत असतो. ज्ञानापासुन पारखा आणि संस्कृतीपासुन पोरका झालेल्या समुदायातून दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा परंपराचा प्रभाव आणि मानवी संस्कृतीचा अभाव तर दिसुन येतोच. पण या समुदायात चरित्रहिनता, व्यक्तीमत्वाचा तथा जडण-घडणीचा आभाव जाणवतो. या समुदायास शिक्षीत वर्ग गुलामाप्रमाणे वागवितो. गुराप्रमाणे त्यांच्याकडून कामे करून घेतो. कष्ट करण्यास भाग पाडतो. त्यांना

संस्कृतीपासुन दुर फेकून देण्यात येते. त्यांचे अस्तित्व नाकारल्या जाते. स्वतःला सुसंस्कृत समजणाऱ्या वर्गाने अज्ञानी जनसमुदायाला कायम अडाणी ठेवण्याचे काम केले असले. तरी हा वर्ग स्वतःला सुशिक्षीत व सुसंस्कृत समजत असे. आज प्रत्येक संस्थाचालकाने, संस्थेने समाजातील हर एक व्यक्तीने आपला तरूण विद्यार्थी, तरूण पिडीचे पाऊल शिक्षणाच्या बाबतीत पुढे कसे पडेल हे बघितले पाहिजे. या प्रश्नांकडे लक्ष वेधले पाहिजे. आणि याच दिशेने आपल्या कार्याची सुरूवात केली पाहिजे. शैक्षणिक कार्य असे करता येईल. यची दिशा ठरवली पाहिजे. हेच कार्य आपणास निवडीने करावे लागणार आहे.

**कुचेकर शिवकन्या आनंत**
**बी.ए. द्वितीय वर्ष**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक विचार आणि वास्तव...

दलित समाजातील लोक डॉ. आंबेडकरांना परमेश्वराप्रमाणे पूज्य मानतात. कारण त्या समाजाला डॉ. आंबेडकरांनी वाचा दिली. आत्मसन्मान, स्वाभिमान दिला. देवाचे असे वर्णन करतांना की, मुळ करतो वाचाला। पंगूमलंध्वत्ये गिरी।। परमेश्वर मुक्या माणसाला वाचा देतो. बोलायला शिकवितो आणि पंगू माणसाला डोंगर ओलांडण्याची शक्ती देतो . शतकानुशतके भारतातील शुद्र समाजाला वाचा नव्हती म्हणजे त्यांना जीभ होती पण बोलता येत नव्हते. आपल्या हातून अन्याय सहन करावे लागत. चीड व्यक्त सुद्धा करता येत नव्हती. बाबासाहेबांनी लाखोंच्या या मुख समाजाला आपल्या हातून काही पराक्रम होणार नाही. आपण वरिष्ठांची फक्त सेवा करण्याच्या लायकीचे अशी मानसिक गुलामगिी पांगळ्या समाजाला बाबासाहेबांनी आत्मतेज स्वाभिमान शिकविला. डोंगर उल्लंघून टाकण्याचा आत्मविश्वास निर्माण केला.

अजुनही बिहारसारख्या राज्यात जास्त प्रमाणात पण अन्यत्रही दलितांना बोलू दिले जात नाही. मतदान दिले जात नाही. ठार मारले जात पण आता दलित समाज जागा झाला आहे. हक्कांसाठी तो जागरूक आहे. मोठमोठ्या पदांवर गुणवत्तेच्या आधारे दलित माणसे गेली आहेत. याचे श्रेय बाबासाहेबांनाच द्यावे लागले. त्यांचे हे कार्य देवासारखे आहे. यात शंका नाही. त्यामुळे बाबासाहेबांचे कार्यच अलौकिक आहे.

मात्र बाबासाहेबांना दलितांचा कैवारी म्हणतात. ते मला आवडत नाही. बाबासाहेब सर्व गोरगरीब स्त्रीपुरूषांचे कैवारी होते. त्यांना दलितांचा कैवारी दलितांचा पुढारी असे म्हणुन आपण त्यांना मर्यादित चौकटीत बसवितो की काय अशी मला शंका येते.

उदाहरणार्थ संविधानात बाबासाहेबांनी प्रौढ मताधिकाराचा हक्क असावा असे आग्रहपूर्वक मांडून ते तत्व सर्वांना सर्वधार्मिक स्त्री पुरूषांना शिक्षण संपत्ती यांच्या अटी न घालता मिळाला. मग बाबासाहेब फक्त दलितांचे पुढारी कसे?

स्त्री पुरूष समानता संविधानात आहे. संवर्ण स्त्री यांना सुद्धा हक्क प्राप्त झाले. मग बाबासाहेब फक्त दलितांचे कैवारी कसे? हिंदू कोड बिलाचा आग्रह बाबासाहेबांनी धरला. त्यानुसार सर्व जातीतील हिंदू मुलींना वडिलांच्या मालमत्तेत वारसा हक्क प्राप्त झाला. याचा फायदा कोणाला झाला? दलित समाजात तर मालमत्तेवाले फारसे नसतातच. मालमत्तेत वाटा या तत्वाचा फायदा हिंदू धर्मातील ब्राह्मण, मराठा, माळी, आदी

जातीतील समाजातील मुलींना मिळाला. तरीसुद्धा बाबासाहेब दलितांचे पुढारी? सांसदीय लोकशाही व्यक्तीस्वातंत्र्य या सर्वांचा फायदा सर्व भारतीय स्त्रीपुरूषांना होतो. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने भारतरत्न आहेत. त्यांनी एक जनतेला जागृत केले. संघटित केले. हा त्यांचा मोठेपणा ही त्यांची थोरवी न ओळखणारे प्रतिग्रामी लेखक (अरूण शौरी) लिहीतात की, बाबासाहेब हा खोटा देव होता. त्याची पुजा करू नका. (वार्शिपिंग फॉल्स गॉडस) अरूण शौरी यांनी असे बदनामीकरण पुस्तक लिहून बाबासाहेबांवर टिका केली म्हणुन ते पुस्तक जाळण्याचा कार्यक्रम आयोजीत करणे हा प्रतिकाराचा मार्ग योग्य नाही. बाबासाहेबांचे व्यक्तीमत्व, कार्य, विचार त्यांचे योगदान स्वत: समजाऊन घेणे व इतरांना सांगणे हा प्रितगाग्यांच्या पराभावाचा एकमते मार्ग आहे. केवळ परिक्षेसाठी बाबासाहेबांच्या विचाराचा अभ्यास करणे पुरेसे नाही. एकाविसाव्या शतकातील आव्हांनाना समर्थपणे तोंड द्यावयाचे असे तर बाबासाहेबांचे समतावादी विचार आत्मसात करणे आवश्यक आहे.

**जीवन व कार्ये :-**

भीमरावांचा जन्म 14 एप्रिल 1891 या दिवशी महू येथे झाला. प्राथमिक शिक्षण सुरू करण्यास त्यांना उशिर झाला. 1904 साली भीमराव वडिलांसोबत मुंबईला आले. 1904 मध्ये ते मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाले. महार समाजातील मॅट्रिक परिक्षा पास होणारा मुलगा म्हणुन त्यांचे कौतूक झाले. मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला. बडोद्याच्या गायकवाड महाराजांनी भीमरावांना शिष्यवृत्ती दिली.

1913 साली बी.ए. झाले. शिष्यवृत्तीची अट होती. की बडोदा संस्थानात नौकरी करावयाची बाबासाहेब नौकरीसाठी गेले. पण अस्पृश्यतेमुळे अपमानास्पद अभुभव आले. त्यांनी नौकरी सोडली व ते कोलंबिया (अमेरिका) विद्यापिठात उच्च शिक्षणासाठी गेले. 1915 साली ते एम.ए. झाले. 1916 साली भारतीय रूपयाचे अर्थशास्त्र या विषयावर त्यांनी पी.एचडी. ही पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी कायद्याच्या अभ्यासास प्रारंभ केला. 1918 साली मुंबईच्या सरकारी कॉलेजमध्ये (सिडनीहॅम) त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणुन नौकरी स्विकारली. पण दोन वर्षात त्या नौकरीचा राजीनामा देऊन मुकनायक हे नियतकालिक काढले व दलित समाजाला जागृत करण्याचा कार्य आरंभिले.

1920 साली बाबासाहेब राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयाचा अधिक अभ्यास करावा. बॅरिस्टर व्हावे या हेतूने लंडनला गेले. यावेळी त्यांना कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी आर्थिक सहाय्य केले. ते सहाय्य

अपुरू असल्याने बाबासाहेबांना लंडनमधील वास्त्व्यास प्रसंगी उपाशी राहून विद्याभ्यास करावा लागला. 1923 साली बाबासाहेब बॅरिस्टर होऊन परत आले व मुंबई हायकोर्टात वकिली सुरू करू लागले. प्रत्येक ठिकाणी त्यांना त्यांच्या जातीमुळे अव्हेलना सहन करावी लागली. 1924 मध्ये बाबासाहेबांनी दलित प्रश्नांचा विचार करण्यासाठी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली व 1927 पासुन बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. अस्पृश्यांना समानता हे वृत्तपत्र सुरू केले. अस्पृश्यांना समानता प्राप्त व्हावी. संख्येच्या प्रमाणात लोक प्रतिनिधीत्व लाभावे. यासाठी प्रयत्न व जनजागरण सुरू केले.

**विभक्त मतदार संघ :-** 1927 साली बाबासाहेबांना मुंबई विधीमंडळात सरकार नियुक्त सद्स्य म्हणुन काम करण्याची संधी मिळाली. त्याची विद्वता व लोकपुरता यांना परकिय सरकारने मान्यता दिली. गांधी, विरूद्ध आंबेडकर हा प्रथवर वाद अस्पृश्यांना विभक्त मतदार संघ असावेत की नाही यावर झाला. 1932 साली पुणे करार झाला व आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी सोडून दिली. गांधींना अधिक राखीव जागा ठेवण्याची ग्वाही दिली. विभक्त मतदारसंघ म्हणजे मतदार अस्पृश्य व उमेदवारही अस्पृश्य राखीव जागा म्हणजे मतदार सर्व जातीचे उमेदवार मात्र दलित असा फरक लक्षात ठेवला पाहिजे. इंग्रज सरकारने मुस्लिम व अस्पृश्य यांच्यासाठी योजना आखली होती. पाकिस्तानचे बीजरोपन विभक्त मतदार संघात झाले.

**आदित्य अविनाश गायसमुद्रे**
**बी.ए. द्वितीय वर्ष,**

# महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक कार्य...

भारतीय समाजसुधारक महिला सशक्तीकर धोंडो केशव कर्वे ऊर्फ अण्णा कर्वे यांचा जन्म 18 एप्रिल 1858 रोजी शेरवली मुरूड (कोकण) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नांव केशव बापुराव कर्वे होते व आई लक्ष्मीबाई केशव कर्वे यांनी महिलांचे शिक्षण, त्यांचे हक्क, विधवा-पुर्नविवाह यासांठी आपले 107 वर्षांचे जीवन वाहिले. इ.स. 1907 साली त्यांनी महाराष्ट्रात पुण्याजवळील हिंगण्याच्या माळरानावर एका झोपडीत मुलींची शाळा उघडली.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जीवन म्हणजे सामाजिक सुधारणा विशेषतः स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी वाहिलेले आधुनिक ऋषितुल्य जीवन त्यांच्या कार्याचा प्रारंभ हा विधवाविवाह पासुन झाला. आणि त्यांची परिणीती स्त्रियांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. धोंडो केशव कर्वे यांचे चिरंजीव र.धों. कर्वे हे होत. त्यांनीदेखील सामाजिक सुधारणेसाठी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

भारामध्येच्या काळात संततीनियंत्रणाच्या प्रश्नांवर बोलणेदेखील गुन्हा मानला जात होता. अशा या काळामध्ये या संपूर्ण कार्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन लोकांना संततीनियमाच्या महत्व पटवून देण्यासाठी र.धों. कर्वे व त्यांच्या पत्नी यांनी अथक परिश्रम घेतले.

या काळामध्ये त्यांना लोकांच्या विरोधाला सामोरे जावं लागलं. समाजाकडून त्यांची उपेक्षा केली गेली. सहजासहजी त्यांचा हा विचार समाजाने या काळामध्ये स्विकारला नाही. मात्र त्याचा हा विचार नक्कीच स्पृहणीय होता. काळाची पावले ओळखणारे असे हे समाजसुधारक होते. भारत सरकारने त्यांना 1858 मध्ये त्यांच्या 100 व्या वाढदिवसानिमीत्त भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केले.

इ.स. 1900 मध्ये अनाथ बालिकाश्रमाचे स्थालांतर हिंगण्यास करण्यात आले. याच परिसरात अण्णांनी विधवांसाठी एक हक्काची सावली निर्माण केली. विधवांचे हे वस्तीगृह ही सामाजिक प्रयोगशाळा होती. स्त्रियांवर होणारे अत्याचार त्यांनी त्यांना दिली जाणारी दुय्यम दर्जाची वागणूक कायम राग येत असे. त्यांचा पंडिता रमाबाई आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या जीवन कार्यांमुळे अण्णासाहेब खूपच प्रभावित झाले होते. थोर तत्वज्ञ हर्बट स्पेन्सर यांच्या विचारांचाही त्यांच्यावर पगडा होता. जपानच्या महिला विद्यापिठाला भेट दिल्यानंतर अण्णासाहेब अत्यंत प्रभावित झाले. त्यांनी पुण्यात भारतातील पहिल्या पहिल्या विद्यापिठाची

स्थापना 1916 साली. पुढे विठ्ठलदास ठाकरसी यांनी 15 लाखांचे अनुदान दिल्याने या विद्यापीठाचे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एस.एन.डी.टी.) असे झाले.

अण्णासाहेबांनी अनेक परदेश दौरे केले. विशेषतः महिलांच्या सबलीकरणाचे आपले अनुभव त्यांनी आफ्रिकेतही जाऊन सांगितले. विधवा महिलांचे प्रश्न आणि त्यांचे शिक्षण याव्यतिरिक्त जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या विरोधातही त्यांनी कार्य केले.

कर्वे यांची चारही मुले रघुनाथ, शंकर, दिनकर आणि भास्कर यांनीही पुढे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भरीव कार्य केले. महर्षी धोंडा केशव कर्वे यांच्या जीवनांवर वसंत कानेटकर यांनी हिमालयाची सावली नावाचे नाटक लिहिले आहे. त्यांचा मृत्यू 9 नोव्हेंबर 1962 हिंगणे आश्रम (पुणे) येथे करण्यात आले.

**अवगुणे प्राचि विश्वास**
**बी.कॉम. द्वितीय वर्ष,**

# महात्मा गांधीजीचे जीवन आणि कार्य...

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची माहिती देशाच्या स्वातंत्र्यात महत्वाची भूमिका बजावणारे सर्वांना सत्य आणि अहिंसेच्या मार्ग दाखवणारे गांधीजी, अर्थात महात्मा यांना देशाचे राष्ट्रपिता म्हणुन संबोधले जाते. मोहनदास करमचंद गांधी यांना महात्मा गांधी या नावाने ओळखले जाते. गांधीजी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नांवे आणि तत्वज्ञ होते. गांधीजीनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे योगदान दिले. ज्याचा अर्थ होतो. ''महान आत्मा.'' भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणायचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 1994 मध्ये पहिल्यांदा त्यांना राष्ट्रपिता असे संबोधले.गांधीजीच्या वचनांचा भारतीय समाजावर खोल प्रभाव आहे. त्यांचा जन्म त्यांचे बालपण, त्यांनी केलेली कार्यै याबाबतची सगळी माहिती आज मराठा झटका डॉट कॉम या वेब पेजद्वारे घेऊन आलो आहोत. चल तर मग, पाहुया महात्मा गांधींची माहिती.

**प्रेरणादायी जीवनचरित्र :-**

जुन 1891 साली महात्माजी बॅरिस्टर पदवी घेऊन भारतात आले. त्यांनी मुंबई येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. मात्र त्यांना वकिलीच्या व्यवसायात फारसे यश मिळाले नाही. अतिशय बुद्धिमत्ता असलेल्या गांधीजींना दक्षिण अफ्रिकेतील एका कृष्णवर्णीय व्यापाऱ्यांनी आपला दावा चालवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला वर्षाच्या कालावधीसाठी दक्षिण आफ्रिकेला नेले. अत्यंत कौशल्याने महात्माजींनी कृष्णवर्णीय व्यापाऱ्याला न्याय दिला.

**महात्मा गांधी यांचे कार्य :-**

दक्षिण आफ्रिकेतील एका वर्षाच्या कालावधीत, महात्माजींना प्रस्थापित शासनाच्या अन्यायकारक जुलमी धोरणाची माहिती झाली. कृष्णवर्णीयांना न्याय मिळावा. या उद्देशाने महात्मा गांधीनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना संघटित केले. प्रस्थापित शासनाच्या विरोधात सत्याग्रह केला. गौरवर्णीय प्रमाणेच कृष्णवर्णीयांना वागणुक मिळावी. यासाठी महात्माजींनी जे कार्य केले. ते सुवर्ण अक्षरात कोरल्यासारखेच आहेत. गांधीजींनी ''बुद्धचरित्र'' आणि ''भगवतगीता'' वाचली गीतेचे सखोल चिंतन केले व त्यातील विचारांचा त्यांच्यावर सखोल परिणाम झाला. महात्मा गांधीनी वैकुंठ माझ्या हृदयात आहे. नावाचे पुस्तक वाचले. राजकीयचे सर्वेदया कल्याणात आपले कल्याण सामावलेले आहे. याची त्यांना जाणीव झाली.

**भारतीय क्राँगेसची स्थापना :-**

गांधीजी ज्यावेळी दक्षिण आफ्रिकेला गेले होते, तेंव्हा त्यांन वर्णभेदाचा सामना करावा लागला. एकदा ट्रेनमध्ये प्रथम श्रेणी प्रशिक्षकाकडे वैद्य तिकीट आल्यावर तिसऱ्या श्रेणीच्या डब्यात प्रवेश दिल्यामुळे त्यांना ट्रेनमधुन बाहेर फेकण्यात आले.

या काळात त्यांच्याबरोबर अशाप्रकारच्या अनेक घटना घडल्या. या सर्व त्यांच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा ठरला.

**गांधीच्या चळवळींच्या महत्वाच्या गोष्टी :-**

- महात्मा गांधी एक महान स्वातंत्र्यसैनिक आणि राजकारणी तसेच एक महान समाजसेवक होते. ज्यांनी देशातील जातीवाद, अस्पृश्यता यासारख्या सर्व दुष्यकृत्य दूर करण्यात महत्वाची भूमिका बजावली. सर्व जाती, धर्म, वर्ग, लिंग, यांच्या लोकांकडे त्यांचा दृष्टिकोन होता.
- सत्य आणि आहिंसेच्या बळावर चळवळ चालवल्या गेल्या.
- आंदोलनादरम्यान हिंसक कारवाया झाल्यामुळे कारवाया झाल्यामुळे काही आंदोलने रद्द करण्यात आली.
- गांधीजीच्या सर्व हालचाली शांततेत पार पडल्या.
- सत्य आणि अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी यांनाही राष्ट्रपिता ही पदवी देण्यात आली होती.
- त्यांनी जातीभेदमुक्त भारताचे स्वप्न पाहिले होते. गांधीजीनी निम मागास आणि दलित वर्गाला ‘हरित्वजन’ असे देवाचे नाव दिले होते आणि समाजात समान हक्क मिळवुन देण्यासाठी अथक प्रयत्न केले होते.
- माझ्या परवानगीशिवाय मला कोणीही दुखावू शकत नाही.
- मनाला योग्य विचारांची सवय लागली की योग्य कृति आपोआप घडते.
- डोळ्याच्या बदल्यात डोळा या तत्वज्ञानाने संपूर्ण जग आंधळे होईल.
- महात्मा गांधी यांचे कार्य आणि जीवन सांगावे तेवढे कमीच आहे.

**ज्ञानेश्वरी बंडू वेताळ**

**बी.ए. द्वितीय वर्ष,**

# शेतकरी आत्महत्या, कारणे आणि उपाय...

शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय खरंतर एक विषय नसुन एक वस्तूस्थिती आहे. त्याबद्दल माझे मत...

खरंतर महाराष्ट्र म्हणजे काय महाराष्ट्र म्हणजे मराठी मनाचा माऊली मातीचा महाराष्ट्र मातीचा दुम असलेला तेजमय रथीचा कुंकूमांचा धगधगता इतिहास सुरात घेऊन पेटणारा महाराष्ट्र पोलादी धानांडाना पेटवणारा महाराष्ट्र गर्जा महाराष्ट्र स्वाभिमानी मराठ्यांचा अभिमान ज्वलंत आणि जीवंत घेऊन जगंदबा गोत उरात घेऊन धुमधुमणारा वादळांचा महाराष्ट्र माझा शिवबाचा महाराष्ट्र...

तो महाराष्ट्र ज्या महाराष्ट्रामध्ये एकेकाळी सोन्याचा धुर निघत होता. त्याच महाराष्ट्रामध्ये धुर आज ही निघतोय परंतु तो सोन्याचा नसुन माझा सोन्या सारख्या शेतकरी बापाच्या चित्तेचा धुर या महाराष्ट्रात निघतोय. आणि त्या चित्तेचा धुरांनी हा महाराष्ट्र काळवंडलांय. खरंतर विज्ञात आणि तंत्रज्ञानाचा युग आहे. 21 व्या शतकांमध्ये जगतोय आपण 21 व्या शतकामध्ये जगत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात.

या आगोदर ही या महाराष्ट्रामध्ये अनेक दुष्काळ पडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये पडला. इतका भयंकर पडला की जन्मदात्या बापाची नजर स्वत:च्या पोटच्या मुलांचा मांसावर जावी ती माऊसही खान्याची इच्छा होती. इतका दुष्काळ या महाराष्ट्रांनी बघितला आत्महत्या केली नाही.

कारण त्या शेतकऱ्यांना आपल्या राज्यावर विश्वास होता. की आपला राजा आपल्या मरू देणार नाही. का तो विश्वास आजच्या सरकार वरती राहिला नाही. हा माझा प्रश्न...

पण दुष्काळ पडतो. खरंतर इतलं सरकार विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आपण वावरतोय. जागतिक महासत्ता होण्याच स्वप्न बघतं असताना. हे सरकार आम्हांला रात्री बारा वाजता दोन वाजता लाईट सोडत मग रात्री दोन वाजता लाईट आल्यानंतर शेतकरी आमचा राजा जगाचा पोशिंदा कुठल्या जिवाची परवा करत नाही. दोन वाजता सगळं जग झोपलेले असत. आमचा बळीराज्या खांद्यावर घोंगडी घेतो. धोतर कंबराला खोचतो आणि शेतामध्ये पाणी भरायला जातो आणि पाणी भरत असताना ते पाणी एक बीळामध्ये जाते. त्या बिळामध्ये पाणी गेल्यानंतर रात्री दोन वाजता मध्य रात्रीला सापाला त्या पाण्याचा स्पर्श होतो. स्पर्श होताच तो साप खळबळून जागा होतो. त्याच क्षणी तो सळसळ करत बाहेर येतो आणि

बघतो तर समोर एक शेतकरी उभायं. त्यानं आपल्या बिळामध्ये पाणी घालयं त्या शेतकऱ्यांचा बदला घेण्यासाठी तितक्याच जोराने क्षणातंच शेतकऱ्याजवळ जातो आणि त्याच्या पायाला कडकाऊन डऊंश करतो. आणि बघतो तर काय वेदनेच्या कळा उठतात आणि मेंदूमधल्या मुंग्याच्या रांगा थयथया नाचतात.

इतका त्रास त्या शेतकरी राज्याला होतो. बघतो तो तर काय काय चावलं हे काळांच्या अंधारात आणि समोर बघतो. तर भला मोठा साप उभा असतो. आणि तो शेतकरी राज्या देवाकडे भीख मागू लागतो. आपल्या जगण्याची भीख मागू लागतो. परंतु ते देव ही त्याला त्या जगण्याची भीख देत नाही. आणि या जगाचा पोशिंदा असलेला माझा बळीराज्या या जगाचा निरोप घेतो.

रात्रीपासुन आपल नवरा शेतामध्ये पाणी भरत आहे. याचा विचार करून त्या शेतकऱ्याची बायको ति माऊली फाटक्या कपड्यामध्ये मिरच्या आणि भाकरी गुंडाळते. डोक्यावर घेते आणि शेतात येते. येत असताना विचार करते की आपला नवरा रात्री पासुन पाणी भरतोय. आपल्या हातानं त्याला दोन घास जीव घातलं पाहिजे. सुखी संसाराची स्वप्न ज्याच्या सोबत बघितले होते. आणि बघते जर काय...

तो नवरा हात्ती सारखा धिपाड असलेला नवरा त्या पाण्याच्या थोडग्यामध्ये पडलेला असतो. क्षणातच डोक्यावरची भाकर फेकून देते आणि म्हणते हे देवा काय केली होती चूक अरे कशाची दिलीस सजा हा माझा राजाचं का घेतलास... कोण जबाबदार आहे याला आपल्या गाडीला आपण दिवसा लाईट लावुन चालतो आणि शेतकऱ्यांला रात्री दोन वाजता लाईट सोडतो. आणि मग शेतकरी का आत्महत्या करतोय.

पूर्वी शेतामध्ये आमची शेती बैलांनी होयची. आता ट्रॅक्टरने करावी. लागते. पहिलं शेतीला मोटेने पाणी असायचं आता वीज पंपानी पाणी द्यावं लागत. पूर्वी शेती घरचेच लोक करायचे आता मजुरांकडून करून घ्यावी. लागते. त्यामुळे शेती महागली आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आणि मग जर या आत्महत्या थांबवायच्या असल्या तर शेतात काय पिकतंय त्यापेक्षा बाजारात काय विकतयं हे ज्या शेतकऱ्यांला कळतय तो शेतकरी समृद्ध असतो.

शेतकरी तर समृद्ध करायचा असेल. तर आमच्या शेतकऱ्याला भाव ठरवायंचा अधिकार द्या आणि शेतकऱ्याला प्रत्येक गावामध्ये वायफाय झोन नको. आम्हांला अग्रीकल्चर झोन निर्माण करून द्यावा. किनारपट्टीची जमिन, डोंगरपट्टीची जमिन ओली करून द्या. ती आमच्या शेतकऱ्याला उपलब्ध करून द्या. या सगळ्या गोष्टी केल्यावर आमचा शेतकरी नक्कीच आत्महत्या करणार नाही. आमच्या शेतकऱ्याला

बँक कर्ज देत नाही. उद्योगपतीला घरी जाउन बँक कबर्ज देते. पण आमच्या शेतकऱ्याला आमच्या बांधावरती कर्ज उपलब्ध करून द्या.

ज्या दिवशी आमच्या शेतकऱ्याला बांधावरती कर्ज उपलब्ध होईल. त्या दिवशी या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या निश्चित पणांनी थांबतील. ते कराव लागणार आहे आणि एक दिवस असा येईल लक्षात ठेवा. तुमच्या आमच्या घरामध्ये कपाटाभरून तर पैसे असतील पण चिमुटभर दाणे नसतील. अरे ज्या दिवशी शेतकरी स्वतःच पोट भरण्यासाठी जगल ना. त्या दिवशी ह्या जगाला उपाशी झोपावे लागेल.

कोरडा दुष्काळ ही फोडतो.

बाप माझा छातीमधल्या दमावर

आणि पाण्यावर तर कोणी ही

करत शेती आणि माझा बाप

करतो अंगा वरच्या घामावर...

**ऋतुजा उमेश सोळंके**

**बी.कॉम. प्रथम वर्ष,**

# मधुमक्षिका पालन...

**मधुमक्षिका पालन :-**

प्राचिन काळापासुन भारतीयांना मधमाशी, मध व मेण या तीन प्रकारचे गुणधर्म, गुणवैशिष्ट्ये आणि त्यांची मानवी जीवनातील माहिती होती, म्हणुनच ऋग्वेद, रामायण व महाभारत, आयर्वेद इत्यादी. भारतीय संस्कृती, शास्त्र व महाकाव्यातुन त्यांचे संदर्भ आढळून येतात. "सर्वेवै कामा मधु" म्हणाजे प्रत्येकाच्या इच्छा ह्या मधाप्रमाणेच निर्भेळ, गोळ व निखळ असाव्यात अशी कामना उपनिषदामधुन व्यक्त केलेली दिसुन येते.

मधासारखे गोड बोला, मधाळ असा, मेणापेक्षा मऊ व्हा असे संदेश आपल्याला श्री. ज्ञानेश्वरांनी संतांच्या वाड्.मयातून उपदेशित केलेले आढळून येतात, मधाला तर ईश्वराचेच रूप मानुन संबोधल्या गेले आहे. अशा मधाळ रसाळ मधाची मुक्तपणे मानवी जीवनाच्या आरोग्यासाठी उधळण करणाऱ्या मधमाशांचे पालन, पोषण संगोपन आणि संवर्धन केवळ मध व मेण उत्पादनासाठीच म्हणुन करावयाचे नाही. तर परागीकरण करून पिकांच्या उत्पादन वाढीमध्ये त्यांच्या उपयोग करून घेणे आवश्यक आहे.

**मधमाशी पालनाचे उद्देश :-**

1) मधुमक्षिका पालनाचा मुख्य उद्देश - कृषि व उद्यानिक पिकांचे विशेषत: फळवर्गीय, भाजीपाला वर्गीय व तेलवर्गीय पिकांचे या मधमाशांद्वारे पराग सिंचन करून उत्पादन वाढविणे.
2) मध, मेण आणि तत्सन पदार्थाचे उत्पादन करणे.
3) मानवी आरोग्यासाठी प्रथिने, संप्रेरके आणि व्हिटॅमिन्स यांचा मुख्य स्त्रोत असणाऱ्या रॉयल जेलीचे उत्पादन तसेच पराग कणाचे उत्पादन करणे.
4) संधीवाताचा चिकीत्सा करण्यासाठी मधमाशीपासुन मिळणाऱ्या विषाचे उत्पादन करणे.

उपरोल्लेखीत मधमाशी पालनाचे विविध उद्देश असले तरी मध उत्पादनावरच सर्व साधारण मानवाचा कल दिसुन येतो. तथापी पिकांच्या उत्पादन वाढीसाठी म्हणुन मधमाश्या पालनाचे महत्व सर्वांना ज्ञात होणे आवश्यक आहे. त्या मुळेच मधमाशी पालन हे कृषि क्षेत्रातील एक महत्वाचे अनिवार्य अंग झाले पाहिजे.

**मधमाशांचे प्रकार :-**

**1) आग्या मधमाशी :-**

या जातीच्या मधमाश्या आकाराने सर्वात मोठ्या आहेत. त्यांची प्रवृत्ती झाडांच्या फांद्यावर, पर्वताचे उंच कडे, उंच इमारतीच्या छताखाली, सज्जाखाली, पाण्याच्या टाकीखाली एकच पण आकाराने भले मोठे पोळे बांधण्याची आहे. या मधमाशीत मध गोळा करण्याची शक्ती इतर मधमाशांच्या तुलनेत फार प्रखर व जबरदस्त असते. त्यांच्या एका पोळयातून एकाच वेळी 30 ते 40 किलो मध मिळू शकतो. या मधमाश्या स्वभावाने फारच चिडक्या रागीट क्रुर असल्यामुळे त्यांना पाळणे सहजा सहजी शक्य झाले नाही. एका वेळी आठ ते दहा मधमाशांनी डंक मारल्यानंतरची शरीराची भयंकर आग होते व ती फारच असहाय्य होते, म्हणुन या मधमाश्यांना आग्या माशी म्हणतात.

**2) झाडी, झुडपी, लहान मधुमक्षिका :-**

ही मधमाशी पण आग्या माशीसारखरी एकच पोळी बांधते. काटे झाडांच्या फाद्यांना विशेषतः लिंब, बाभूळ, खैर किंवा झडुपांमध्ये पोळ बांधते. या माशीला थंड हवामान सहन होत नाही.

ही माशी प्रामुख्याने सपाट व सम हवामान असणाऱ्या प्रदेशात आढळते. य माश्या हाताच्या पंज्या ऐवढी व प्रसंगी मोठी पोळी पण बांधतात. हिच्या पोळीतून एका वेळेस अर्धाते एक किलो मध मिळतो. या माश्या अतिशय भित्र्या असतात. थोडा जरी त्रास झाला. तरी त्या पोळे सोडून पळून जातात. या माशांना पण आग्या माश्यांसारखे माणसाळू शकत नाही.

**3) सातपुडी (सांतेळ, सातेरी, सातपाळी) मधमाशी :-**

ही मधमाशी संपूर्ण भारतात आढळून येते. या माशा नेहमी अंधाऱ्या जागेत, झाडाच्या पोकळीत, विजेच्या खांबाच्या पोकळीत, दगड निखळून झालेल्या विहिरीतील किंवा घराच्या पोकळीत, वापरात नसलेल्या आलमारीत, अडगळींच्या जागी असलेल्या रिकाम्या मडक्यात किंवा सुरईत, जुन्या टाकून दिलेल्या मोटार, ट्रक किंवा ट्रॅक्टरच्या टायरमध्ये कामात नसलेल्या पाईपच्या तुकड्यात जमिनीतील पोकळीत राहतात. अशा पोकळीत त्या नेहमी एकमेकाला समांतर अशी सात पोळी एक रांगेत बांधतात. त्यामुळेच त्यांना सातपुडी, सातेळ, सातेरी वा सातपाळी अशी नावे दिली आहेत. या मधमाशा स्वभावाने गरीब असतात व सहजरित्या माणसाळतात.

त्यांच्या या गुणवैशिष्ट्यामुळे त्यांन कृत्रिम अशा लाकडी पेट्यांत 7 ते 10 चौकटी ठेवुन त्या पोकळीत चांगल्याप्रकारे पाळता येतात. या आकाराने आग्यामाशापेक्षा लहान व झुडपी माशापेक्षा मोठ्या असतात.

या मधमाशा वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी राहतात व पोकळी मोठी असेल तर पोळ्यांची संख्या 9 ते 10 पर्यंत वाढवितात. व त्यांचा आकार देखील मोठा करतात. त्यांच्या पोळ्यांमधुन एकाच वेळी 3 ते 4 किलो मध मिळू शकतो.

**मधमाशांच्या प्रजाती :-**

भारतीय मधमाशांच्या (सातपुडी) पोळ्याचे सर्वसाधारणपणे जर सुक्ष्मरित्या अवलोकन केले तर आपणास मधमाशी हा एक सामाजिक किटक असुन संघटना करून राहतो असे दिसुन येते. एका पोळ्यात सुमारे स्थल हवामानानुसार 30000 ते 40000 माशा असतात. पोळीत तीन प्रकारच्या प्रजाती आढळतात.

**1) राणीमाशी** **2) नर** **3) कामकऱ्या माशा**

1. **राणीमाशी :-** एका पोळीत एकच राणीमाशी असते. ती नर व कामकऱ्या माशांपेक्षा बरीच मोठी असते. आणि इतर माशांचे भवितव्य केवळ या राणीमाशीवरच अवलंबुन असते. कारण ती सर्वांची आई असते. पोळ्यात राणी माशीचे कार्य हे फक्त अंडी देण्याचे असते.

   तिचे आयुष्यमान सर्वसाधारणपणे 2 ते 3 वर्ष असते. तथापि आश्चर्यांची गोष्ट अशी जेव्हा ती शक्तीहिर व अंडी देण्यास असमर्थ आढळते. तेंव्हा कामकऱ्या माशा तीला मारतात व पोळ्यात नवी राणीमाशी निर्माण करण्याचे कार्य तत्परतेने करतात. राणीमाशी दोन प्रकारचे अंडी देते.

**फलित आणि अफलित :-** यापैकी फलित अंड्यातुन कामकऱ्या माशा जन्मतात व अफलित अंड्यातुन नर जन्माला येतात. राणीमाशी जवळपास एका तासाला 1000 अंडी देते. म्हणुनच तिला अंडी देणारे यंत्र म्हणतात.

नर माशीला पोळ्या बाहेर हाकलून लावताना कामकिर माशी ती कधीही पोळी सोडून जात नाही. नविन राणी मात्र केवळ नराबरोबर संबंध करण्यासाठीच पोळीबाहेर पडते व संबंध झाल्यानंतर नर त्वरित मरतो आणि राणी माशी पुढिल प्रजोत्पत्तीसाठी आपल्या पोळ्यात परत येते. कामकऱ्या माशा तिची सर्व प्रकारची काळजी घेत असतात. राणी माशी ही एका वेळी एका अणु कोशात एक अंडी घालते.

2. **नर :-** एका पोळ्यात 200 ते 500 पर्यंतची नराची संख्या असते. हे कामकऱ्या माश्यापेक्षा मोठे पण राणीमाशीपेक्षा लहान असतात. नरांनी नांगी नसते. नरांचे पोळ्यातील कार्य म्हणजे राणी माशीला फलित करणे एवढ्यापुरतेच मर्यादित असते. हिवाळ्यात म्हणजे जेव्हा झाडांपासुन मकरंद आणि

परागकण कमी प्राप्त होतात. तेंव्हा या नरांना कामकऱ्या माशा पोळ्यातून हुसकाऊन बाहेर घालवितात किंवा मारतात. ते फक्त प्रजोत्पत्ती करण्याच्या हंगामात राणीमाशी बरोबर संबंध निर्माण करण्यासाठीच निर्माण केले जातात.

3. **कामकऱ्या माशा :-** या माशा म्हणजे पोळ्यातील अतिशय महत्वाच्या व आवश्यक घटक असतात. कामकऱ्या माशा म्हणजे प्रजोत्पत्तीसाठी विकसीत न झालेल्या माश्याच असतात. अंडी देण्याव्यतिरिक्त पोळ्यातील सर्व कामे याच मधमाशा करतात. या माशांच्या शरीराच्या शेवटी टोकाला एक नांगी असते. तीला बोरीच्या काट्यासारखे काटे असतात. शत्रुपासुन पोळ्यांचे सरंक्षण करण्यासाठी शत्रुला डंख मारण्यासाठी या नांगीचा उपयोग केल्या जातो आणि कामकरी माशी जेव्हा डंख मारते तेंव्हा ती नांगी पूर्णपणे शत्रुच्या शरीरातून तिला उलटे काटे असल्यामुळे काढू शकत नाही. आणि अधिकच जोर देऊन नांगी काढण्याचा प्रयत्न जेव्हा ती करते तेंव्हा शरीरातील बराच भाग बरोबरच खेचल्या जातो आणि शेवटी माशी मरते.

या कामकऱ्या माशा पोळ्यात अनेक प्रकारची कामे करत असतात. 1) मकरंद, परागकण आणने., 2) पोळं बांधणे, 3) पाणी आणणे, 4) राणी माशीच्या अनुपस्थितीत राणीहीन पोळे असताना आणि राणीमाशी अंडी देण्यास असमर्थ आढळली असताना कामकऱ्या माशांच राण्ी माशीच घर तयार करून त्यात अंडी घालण्याचे कार्य करणे म्हणजे नवीन राणी तयार करण्याचे कार्य करणे. अन्न भरणे, व तिची सर्व प्रकारची काळजी घेणे. 5) पाणी, परागकण, मकरंद, इत्यादी अन्नासाठी कुठे आहे हे शोधून काढून हे पदार्थ गोळ करणाऱ्या माशांना कळवणे, मार्गदर्शन करणे. 6) अन्न जवळ आहे का दूर याची माहिती देणे. इत्यादी सर्वसाधारणपणे अधिक कामाच्या कालावधीत त्यांचे आयुष्यमान हे 5 ते 7 आठवडे असते. पण हिवाळ्यात व वातावरणात अधिक मकरंद व परागकण नसताना त्या कालावधीत त्या 4 ते 5 महिने पर्यंत जगू शकतात.

**श्रद्धा शरद शेळके**
**बी.एस्सी. द्वितीय वर्ष,**

# आइन्स्टाईन यांचे जीवन आणि कार्य...

अल्बर्ट आइन्स्टाईन यांचा जन्म यांचा जन्म 14 मार्च रोजी उल्म, वुटेमबर्ग जमर्नी येथे झाला. ते भौतिकशास्त्रज्ञ होते. ज्यांनी सापेक्षचे विशेष आणि सामान्य सिद्धांत विकसीत केले. 1921 मध्ये त्यांना भौतिकशासत्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. फोटो इलेक्ट्रीक प्रभाव विकसीत करण्यासाठी पसिद्ध होते. त्यांचे वडिल हर्मन आइन्स्टाईन आणि आई पॉलिन कोच त्यांचे वडिल पिसेदार सेल्समन होते. आणि नंतर त्यांनी मध्यम यशाने इलेक्ट्रोकेमिकल कारखाना चालवला. त्यांना मारिया नावाची एक बहिण होती.

अल्बर्ट आइन्स्टाईन यांनी 1903 मध्ये मिलेवा मॅरिकशी लग्न केले. या जोडप्याला एक मुलगी आणि दोन मुले होती.

भौतिक शास्त्रातील समस्या सोडवण्यात नेहमीच रस होता. आणि त्या सोडवण्याचा त्यांचा स्पष्ट दृष्टिकोन आणि दृढनिश्चयही होता. त्याने आपली रणनिती स्वतःच बनवली आणि त्यांचा ध्येयाच्या मार्गावरील मुख्य टप्पे दुश्यमान करण्यात सक्षम झाला. त्यांनी 1916 मध्ये सापेक्षतेच्या सिद्धांतावर शोधनिबंध प्रकाशित केला. यावेळी त्यांनी किरणोत्सवर्ग आणि सांख्यिकीय यांत्रिक सिद्धांतांत योगदान दिले.

**अल्बर्ट आइन्स्टाईन :- महत्वाची कामेृ**

1) **विशेष सापेक्षता सिद्धांत (1905)**
2) **सापेक्षतेचा सामान्य सिद्धांत (1916)**
3) **भौतिक शास्त्राची उत्क्रांती (1938)**

त्यांनी 1920 च्या दशकात युनिफाईड फील्ड थीअरी तयार करण्यास सुरूवात केली आणि ते क्वांटम सिद्धांताच्या संभाव्य स्पष्टीकरणावर देखील काम करत होते. हे काम त्यांनी अमेरिकेत जपले. मोनोॲटोमॅटिक गॅसचा क्वांटम सिद्धांत विकसीत करून त्यांनी सांख्यीकिय यांत्रिकीमध्ये योगदान दिले. त्यांनी अणु संक्रमण संभाव्यता आणि सापेक्षतावादी विश्वविज्ञानाच्या संदर्भात मौल्यवान कार्य केले.

सेवा निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी भौतिकशास्त्राच्या मुलभूत संकल्पनाच्या एकत्रिकरणासाठी काम सुरू ठेवले. बहूसंख्य भौतिकशास्त्रज्ञ म्हणुन त्यांनी भूमितीकरणाच्या विरूद्ध दृष्टिकोन स्विकारला. त्यांनी अनेक युरोपियन आणि अमेरिकन विद्यापिठांमधुन विज्ञान वैद्यक आणि तत्वज्ञान या विषयात मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त केली.

**अल्बर्ट आइन्स्टाईन :- अशास्त्रीय कार्ये आहेत.**

**1) झिओनिझम बद्दल (1930)**

**2) युद्ध का? (1933)**

**3) माझे तत्वज्ञान (1934)**

**4) माझ्या नंतरच्या वर्षापैकी (1950)**

जेंव्हा त्यांचे वैज्ञानिक कार्य सुरू करून झाले. तेंव्हा अल्बर्ट यांना न्युटोनियन अपुरेपणा जाणवला आणि त्यांचा विशेष सापेक्षता सिद्धांत यांत्रिकी नियमांचे इलेक्ट्रोमॅग्नेटिक फिल्डच्या नियमांशी जुळवून घेण्याच्या प्रयत्नातून निर्माण झाला.

**अल्बर्ट आइन्स्टाईन :- पुरस्कार आणि सन्मान**

1) बर्नॉर्ड पदक (1920)

2) भौतिक शास्त्रातील नोबेल पारितोषिक (1921)

3) मॅख्युची पदक (1921)

4) For MemRs (1921)

5) Coply पदक (1925)

6) सुंवर्ण पदक (1926)

7) मॅक्स प्लँक पदक  (1929)

8) बेंजामिन फ्रँकलिन मेडल (1935)

9) नॅशनल एकेडमी ऑफ सायन्सेसचे सद्स्य (1942)

10) टाईम पर्सन ऑफ द सेंच्युरी (1999)

त्यांचा मृत्यू 18 एप्रिल 1955 रोजी प्रिन्स्टन, न्यु. जर्सी, अमेरिका येथे झाला.

**रूद्रा वंदना राजाभाऊ**

**बी.एस्सी. प्रथम वर्ष,**

# लोक मान्य टिळक...

## “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच”...

अशी सिंहगर्जना करून इंग्रजांना हारदून सोडणारे, थोर देशभक्त, म्हणजे **‘लोकमान्य टिळक’**

आज मी तुम्हांला भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी लेखक लोकमान्य टिळक यांची यशोगाथा सांगणार आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये पहिले नेते, व भारतीय असंतोषाचे जनक व ‘लोकमान्य’ अशी पदवी देण्यात आली होती. आज आपण यामध्ये लोकमान्य टिळकांचे पारिवारीक जीवन, त्यांचे शिक्षण, सामाजिक जीवन, राजकीय जीवन व त्यांचे कार्य याबद्दल माहिती घेणार आहोत.

लोकमान्य टिळक यांचा जन्म 23 जुलै रत्नागिरी येथील चिखली या गावात हिंदू धर्मातील चित्पावन ब्राह्मण कुटूंबामध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नांव गंगाधर रामचंद्र टिळक त्यांचे वडिल शाळेत शिक्षक या पदवीवर टिकून होते. आणि लोकमान्य टिळक 16 वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. वडिलांच्या मृत्यू होण्याच्या काही महिन्या पहिलेच 1871 मध्ये केशव 16 वर्षाचे होते. तेंव्हाच त्यांचे पालन तापीबाई यांच्याशी झाले.

तापीबाई यांचे नांव लग्नानंतर ‘सत्यभामाबाई’ बदलून ठेवले.

**लोकमान्य टिळक यांचे शिक्षण :-**

लोकमान्य टिळक यांनी लग्नांनंतर पुण्यातील डेक्कन कॉलेज येथून 1877 मध्ये गणित विषयात बी.ए. पदवी घेतली आणि एल.एल.बी.चे शिक्षण करण्यासाठी त्यांनी एम.ए. चे शिक्षण मध्येच सोडले. व 1879 मध्ये गर्व्हनमेंट लॉ कॉलेज मधुन एल.एल.बी.ची पदवी घेतली. एल.एल.बी. ची पदवी घेतल्यानंतर त्यांनी पुण्याच्या एका खाजगी शाळेमध्ये गणित विषय शिकवण्यास चालु केले व येथील शिक्षकांमध्ये मतभेद झाल्यामुळे त्यांनी शिकवण्याचे बंद केले. व पत्रकारी सुरू केली. सार्वजनिक कामांमध्ये टिळक क्रियाशिल पणे सहभागी व्हावयचे.

**लोकमान्य टिळकांनी काढलेले वृत्तपत्र (Newspaper) :-**

लोकमान्य टिळ यांनी 1881 मध्ये लोकांना भारतातील लढाया आणि संकटाची ओळख करून देण्याकरीता व स्वराज्याचे विचार निर्माण करण्यासाठी आणि आपल्या हक्कांसाठी लढण्याची मनस्थिति तयार करण्यासाठी 'केसरी'आणि 'मराठा' हि दोन वृत्तपत्रे काढली.

**लोकमान्य टिळक यांची सामाजिक व शैक्षणिक कार्य :- (Social & Educational Work of Lokmanya)**

1880 मध्ये लोकमान्य टिळक यांनी त्यांच्या महाविद्यालयातील मित्र विष्णूशासत्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगारकर, महादेव बल्लाळ, नाम जोशी या मित्रांसह माध्यमि शिक्षण घेण्यासाठी न्यु इंग्लिश स्कुलची स्थापना केली व भारतातील सर्व तरूणांकरीता शिक्षण देण्याच्या पद्धतीत बदल करणे व हाच त्यांचा उद्देश होता. शाळेच्या स्थापनेत यशस्वी झाल्यामुळे टिळकांनी 1884 मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व एक वेगळी शिक्षण पद्धत तयार केली. ज्यामुळे भारतीय संस्कृतीवर भर टाकून भारतीय तरूणांना आपल्या राष्ट्रहिताचे विचार शिकवले जातील. आणि 1885 मध्ये डेक्कन ऐज्युकेशन सोसायटीने महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी फर्ग्युसन कॉलेजनची स्थापना करण्यात आली व लोकमान्य टिळकांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित व संस्कृत विषय शिकविण्यास सुरूवात केली. नंतर 1890 मध्ये लोकमान्य टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडली.

**लोकमान्य टिळक यांचे सामाजिक कार्य :-**

लोकमान्य टिळक यांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या आहेत. बालविवाह विरूद्ध आवाज, जातीव्यवस्था व जाती भेदभाव दूर करणे, विधवा पुनर्विवाह व महिलांच्या शिक्षण व विकासासाठी प्रयत्न केले. अशा अनेक सामाजिक सुधरणा केल्या.

**लोकमान्य टिळक यांचे राजकीय कार्य :-**

लोकमान्य टिळक यांनी यांच्या विस्तृत अशा राजकीय कामांमध्ये ब्रिटींशाच्या राजवटीपासुन मुक्त होण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यासाठी व अधिकारासाठी लोकमान्यांनी संघर्ष केले. महात्मा गांधी यांच्या पहिले ते भारतातील प्रख्यात असे पहिले राजकीय नेते होते. लोकमान्य टिळक हे कट्टर राष्ट्रवादी पण सामाजिक परंपरावादी म्हणुन त्यांना ओळखले जात होते.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष :-**

1890 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये टिळकांनी प्रवेश केला. स्वराज्यच्या संघर्ष करत काँग्रेसच्या उदारमतवादी विचारांना विरोध घातला. टिळकांनी सांगितले की, ब्रिटींशाच्या विरोधात साधी सोपी घटनात्मक चळवळ करणे सार्थकी ठरणार नाही. व काँग्रेसचे प्रमुख नेते गोपाळकृष्ण गोखले यांच्या विरोधात ते उभे राहिले.

या अशा कर्तबगारी महान, राजकारणी, लेखक लोकमान्य टिळकांना विनम्र अभिवादन.

**पुजा विजय लोकरे**
**बी.कॉम, प्रथम वर्ष,**

# लोक मान्य टिळक यांचे जीवन व कार्ये...

बाळगंगाधर टिळक हे एक स्वातंत्र्यसेनानी, राजकारणी, लेखक, व संपादक होते. ज्यांनी भारतांच्या स्वातंत्र्याचा पाया रचला. टिळक फक्त चांगले संपादकच नव्हते तर संस्कृत, गणित, खगोलशास्त्र यांच्यामधील मान्यताप्राप्त अभ्यासकपण होते. 1914 मध्ये त्यांनी इंडियन होम रूल लिगची स्थापना केली आणि ते त्याचे अध्यक्ष होते.

बाळ गंगाधार टिळकांचा जन्म 23 जुलै 1856 रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील चिखलगाव येथे झाला. त्यांचे संपूर्ण नांव लोकमान्य श्री. बाल गंगाधर टिळक होते. टिळकांचा जन्म मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नांव श्री. गंगाधर रामचंद्र टिळक होते. येथे सहाय्यक शिक्षक होते. आणि त्यानंतर पुणे आणि ठाण्यात सहाय्यक उपनिरीक्षक होते. ते त्यांच्या काळातील सर्वात लोकप्रिय शिक्षक होते. त्यांनी त्रिकोणमिती आणि व्याकरण यावर पुस्तके लिहीली व प्रकाशित केली. तथापी आपल्या मुलाचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी ते फार काळ जगले नाही. लोकमान्य टिळकांचे वडील श्री. गंगाधर रामचंद्र टिळक यांचे 1872 मध्ये निधन झाले.

**कार्य :-** स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील एक युग म्हणजे लोकमान्य टिळक होय. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच ही भावना टिळकांनी प्रत्येक भारतीय नागरीकांमध्ये निर्माण केली. अनेक वर्ष इंग्रजांचे गुलाम झालेल्या जनतेच्या मनात प्रखर राष्ट्रवाद, देशप्रेम व स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्याचे महत्वाचे काम टिळकांनी केले.

लोकमान्य टिळक हे प्रखर पत्रकार, थोर समाजसुधारक, स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय नेता, संस्कृत भाषेचे पंडित आणि एक विद्ववान शिक्षक होते.

1) **डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना :-** भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात 1884 मध्ये टिळकांनी रानडे, आगारकर व भांडारकर यांच्या मदतीने डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्ध्थापना केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था महाराष्ट्रातील पुणे शहरात स्थित आहे.

**2) फर्ग्युसन कॉलेज :-** पुणे येथे 2 जानेवारी 1885 मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे फर्ग्युसन कॉलेज स्थापन केले. कामामध्ये त्यांना आगारकर व विष्णुपंत चिपळुणकर यांनी मदत केली. फर्ग्युसन कॉलेजला NAAC द्वारे A ग्रेडने मान्यता दिली आहे.

**3) न्यु इंग्लिश स्कुलची स्थापना :-** 1 जानेवारी 1880 साली लोकमान्य टिळक यांनी गोपाळ गणेश आगारकर , वामन शिवराम आमटे तसेच त्यांचे मित्र महादे बल्लाळ, नामजोशी आणि विष्णू शास्9ी चिपळूणकर यांच्या मदतीने पुणे येथे न्यु इंग्लिश स्कूलची स्थापना केली.

**4) आर्यभूषण छापखाना :-** लोकमान्य टिळक व आगार यांनी 5 जानेवारी 1881 मध्ये ‘केसरी’ या मराठी दैनिकाची सुरूवात. 2 जानेवारी 1881 मध्ये ‘मराठा’ या इंग्रजी दैनिकाची सुरूवात केली.

5) **स्वराज्याची घोषणा :-** स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणाराच हे टिळकांनी ब्रिटीशांना ठणकाऊन सांगितले.

**6) प्रतियोगी सहकरिने :-** 1917 साली टिळकांनी ‘प्रतियोगी सहकरिने’ ची संकल्पना मांडली.

**7) शिवजयंती सुरू केली :-** 1885 मध्ये टिळकांनी शिवजयंती सुरू केली.

**देवकर पायल ज्ञानेश्वर**
**बी.एस्सी., प्रथम वर्ष,**

# पंडित जवाहरलाल नेहरू यांचे लोकशाही विषयी विचार आणि वास्तव...

नेहरू यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये हॅरो स्कुल आणि ट्रिनीटी कॉलेज, केंब्रिज येथे झाले आणि इन्नर टेम्पल येथे त्यांनी कायद्याचे प्रशिक्षण घेतले. बॅरिस्टर झाल्यावर ते भारतात परतले आणि आलाहाबाद उच्च न्यायालयात त्यांनी नावनोंदणी केली. हळूहळू राष्ट्रीय राजकारणात नेहरूनी रस घेण्यास सुरूवात केली. आणि कालांतराने यात पूर्णवेळ सहभागी झाले. ते राष्ट्र्य काँग्रेसमध्ये सामिल झाले आणि 1920 बनले. त्यांना पुढे महात्मा गांधीने समर्थन प्राप्त झाले. पुढे गांधीनी नेहरूना त्यांच्या राजकीय वारसा म्हणुन नियुक्त केले.

1929 मध्ये काँग्रेस अध्यक्ष म्हणुन नेहरूनहीब्रिटिश राजवटीपासुन संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केंली. 1930 च्या दशकात नेहरू आणि काँग्रेसचे भारतीय राजकारणावर वर्चस्व होते. नेहरूनी 1937 च्या भारतीय प्रातीय निवडणुकामध्ये धर्मनिरपेक्ष राष्ट्राच्या कल्पनेला चालना दिली. ज्यामुळे काँग्रेसला निवडणुकीत विजय मिळवता आला आणि काँग्रेसने अनेक प्रातांमध्ये सरकारे स्थापन केली. सप्टेंबर 1939 मध्ये व्हॉईस रॉय लॉर्ड लिनलिथगोयांच्या भारतीयांशी सल्लामसलत  नकरता दुसऱ्या महायुद्धात सामील होण्याच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी कॉग्रस मंत्री मंडळांनी राजीनामा दिला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या 8 ऑगस्ट 1942 च्या  भारत छोडो ठरावानंतर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना तुरूगात टाकण्यात आले. आणि काही काळासाठी संघटना चिरडली गेली. नेहरू, ज्यांनी तात्काळ स्वातंत्र्यासाठी गांधीच्या अहवानतेकडे अनिच्छेने लक्ष दिले होते. आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यान मित्र राष्ट्रांशी युद्ध प्रयत्नांना पाठिंबा देण्याची इच्छा व्यक्ती केली होती, ते दीर्घकालिन तुरूंगवासुन बाहेर आले. आणि राजकीय परिदृश्य बदलले. मुहमद अली जीना यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लिंगची मध्यंतरी मुस्लिम राजकारणावर वर्चस्व गाजावयाला आली होती. 1946 च्या प्रांतीक निवडणुकांमध्ये काँग्रेसने निवडणुका जिंकल्या. परंतु लिगने मुस्लिमासाठी राखीव असलेल्या सर्व जागा जिंकल्या, ज्यांच्या अर्थ पाकिस्तानसाठी एक स्पष्ट आदेश असल्याचे ब्रिटीशांनी स्पष्ट केले. नेहरू हे सप्टेंबर 1946 मध्ये भारताचे अंतरिम पंतप्रधान बनले. आणि ऑक्टोंबर 1946 मध्ये लिग त्यांच्या सरकारमध्ये सामिल झाली.

**लोखंडे प्रथमेश सुंदर**
**बी.ए., द्वितीय वर्ष,**

# आनंदमयी जीवनासाठी ...

तर हे पुस्तक का वाचाव. आपल्या जीवनामध्ये अनेक संकट येत असतात. ते संकटामध्ये गुंतून न राहता. त्या संकटाना पार करून जीवनामध्ये कसे जायचे. हे या पुस्तकांमध्ये आहे. ते पुस्तक म्हणजेच आनंदमय जीवनासाठी व याच प्राचार्य रा.तु. भगत हे आहेत.

